# सर्वोदयाचा इतिहास व शास्त्र

१०५५०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. ५९४

REFBK-0007464
REFBK-0007464

— शंकरराव देव

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प ५६ वें

# सर्वोदयाचा इतिहास व शास्त्र

लेखक

श्री. शंकरराव देव

REFBK-0007464

REFBK-0007464

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

डिसेंबर, १९५० ]

[ मूल्य १२ आणे

प्रकाशक
रघुनाथ गणेश जोशी
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

मुद्रक
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार, पुणें २

७४६४ ५६

# सर्वोदयाचा इतिहास

शब्दांमध्यें शक्ति असते. मात्र अर्थ समजून घेऊन त्यांचा व्यवहारांत नीट उपयोग केला पाहिजे. कालाच्या ओघांत जुने शब्द नाहींसे होतात किंवा त्यांना नवीन अर्थ प्राप्त होतात. अनेकार्थी शब्दयोजना केल्यामुळें वितंडवाद माजतो किंवा विरोध उत्पन्न होतो. त्याचप्रमाणें शब्दांचा अर्थ पुरा समजून न घेतां व्यवहारांत त्यांचा उपयोग केल्यामुळें आत्मवंचनेचा व परवंचनेचा असा दुहेरी दोष माणसाच्या माथीं येतो. म्हणून शब्द योजतांना त्यांचा निश्चित अर्थ करून ते योजले पाहिजेत. ‘ सर्वोदय ’ हाच शब्द घ्या. ‘ सर्वांचा उदय तो सर्वोदय ’ असा हा षष्ठी तत्पुरुष समास होईल. वरवर पाहिल्यास या शब्दाचा अगदीं सोपा अर्थ दिसतो. पण थोडा विचार केला, तर तो वाटतो तितका सोपा नाहीं असें लक्षांत येईल. ‘ सर्वांचा उदय ’ यांत सर्व म्हणजे किती ?

सर्वांचा याचा अर्थ स्वतःचा, कुटुंबांतील सर्व माणसांचा, किंवा स्वतःच्या आळींतील किंवा गांवांतील सर्व लोकांचा, असा होऊं शकेल. स्वतःची जाणीव ( Consciousness ) किती संकुचित अगर व्यापक आहे यावर तें अवलंबून आहे. जगांत दोन्ही प्रकारचे लोक असतात. ज्यांची जाणीव स्वतःच्याशिवाय दुसऱ्याचा विचार करूं शकत नाहीं असे लोक जसे जगांत असतात, तसे ज्यांची जाणीव सर्व विश्वाचा विचार करते असेहि लोक असतात. ह्यावरून हें उघड आहे, कीं ‘ सर्वांचा ’ ह्या शब्दाचा अर्थ प्रत्येकाच्या बाबतींत निरनिराळा होऊं शकेल.

‘ सर्वोदय ’ या शब्दांतील ‘उदय’ हा दुसरा शब्द आतां घेऊं या. उदय होणें म्हणजे वर येणें, उत्कर्ष होणें. सूर्य वर आला म्हणजे आपण सूर्योदय झाला असें म्हणतों. एकादा माणूस, एकादें घराणें, अथवा एकादा देश वर आला असें जेव्हां आपण म्हणतों, तेव्हां सर्वसाधारणपणें वित्तेषणा अगर लोकेषणा अशांसारख्या भौतिक बाबतींत त्याचें भाग्य

उदयाला आलें, असेंच आपण मानतों. एकादा पुरुष अगर एकादी स्त्री भाग्यवान् आहे असें जेव्हां आपण म्हणतों, तेव्हां त्याचा अर्थ आपल्याला असा अभिप्रेत असतो, कीं त्याला किंवा तिला भौतिक सुखाचा लाभ झालेला आहे. कारण सुख हेंच माणसाचें ध्येय आहे; व संपत्ति, कीर्ति यांसारख्या वस्तू सुखाचीं साधनें आहेत, असें सर्वसामान्यपणें मानलें जातें. आजकाल जगांतील कांहीं राष्ट्रांना 'महान् राष्ट्रें' असें आपण संबोधितों, तें सुद्धां त्यांच्या भौतिक संपत्तीच्या किंवा शक्तीच्यामुळेंच. माणसाला सुखासाठीं भौतिक संपत्तीची जरुरी असली, तरी भौतिक संपत्तीपासून मिळणारें सुख म्हणजेच सर्व सुख, असा आपल्यापैकीं प्रत्येकाचा अनुभव नाहीं. कारण, माणसाला जसें शरीर आहे, तसें त्याला मन आहे, बुद्धि आहे व आत्माहि आहे. म्हणून शारीरिक सुख म्हणजेच खरें सुख असें आपण मानीत नाहीं. केवळ शारीरिक सुखानें आपणांस खरी शान्तीहि मिळत नाहीं. "जी संपत्ति तुम्ही मला विभागून देत आहांत, तिच्यापासून मला खरें सुख मिळेल का ?" असा मैत्रेयीनें आपला पति याज्ञवल्क्य याला प्रश्न केला असतां त्यानें उत्तर दिलें, "अशा संपत्तीनें संपन्न असलेल्या लोकांना जें व जसें सुख मिळतें, तसें सुख तुला मिळेल. वित्तानें कोणालाहि अमृतत्वाची प्राप्ति होण्याची आशा नाहीं." यावर मैत्रेयी आपल्या पतीला पुन्हां म्हणाली, "ज्यानें शाश्वत सुखाची प्राप्ति होते तें 'अमृतत्व' मला पाहिजे आहे, हें वित्त मला नको. ज्यानें अमृतत्व मला मिळेल, ती ब्रह्मविद्या मला द्या." मानवी मनाला शाश्वत सुखाची जी भूक असते, त्याचें कारण त्याचें मूळ अमृतत्वांत अंतर्भूत आहे. जोंपर्यंत त्याला या अमृतत्वाचा म्हणजे आत्मतत्त्वाचा लाभ झाला नाहीं, तोंपर्यंत केवळ शारीरिक सुखाच्या लाभानें त्याची सुखाची भूक तृप्त होत नाहीं.

सूर्योदय झाला म्हणजे सर्व पृथ्वी प्रकाशित होते व त्या प्रकाशांत माणसें आपआपला व्यवहार करूं लागतात. माणसाला त्याच्या साध्या चर्मचक्षूंनीं सूर्यप्रकाशांत बाह्य जगांतील वस्तू दिसतात. रात्र झाली म्हणजे याच वस्तू पाहण्यासाठीं त्याला चंद्र, तारे किंवा दिव्याच्या प्रकाश लागतो. पण सूर्याच्या काय किंवा दिव्याच्या काय, पर प्रकाशांत माणसाला वस्तूचें जें दर्शन होतें, तें तिच्या बाह्य स्वरूपाचेंच होतें. मूळ स्वरूपाचें, सत्य स्वरूपाचें होत नाहीं.

गीतेच्या ११ व्या अध्यायांत अर्जुनानें इच्छा प्रदर्शित केल्यामुळें भगवान् श्रीकृष्णानें त्याला आपलें विश्वरूप दाखविलें. पण तें त्याच्या चर्मचक्षूंनीं दिसणें शक्य नसल्यामुळें भगवानांनीं त्याला दिव्य चक्षू दिले :

न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥

मनुष्य जेव्हां अंतर्मुख होतो, तेव्हां त्याला या बाह्य प्रकाशाचा कांहींच उपयोग होत नाहीं. हें अंतःसृष्टीचें दर्शन स्वयंप्रकाशित आत्मप्रकाशांतच होतें:

सर्व द्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ।
ज्ञानं यदा तदा विद्यात्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥

सूर्य नाहीं, चंद्र नाहीं, अग्नि नाहीं आणि वाणीहि पण थंड झाली अशा अवस्थेंत आत्माच माणसाला प्रकाश देतो, असें उपनिषदांत म्हटलें आहे.

माणसाच्या अंतःकरणांतील दीपज्योत जेव्हां उजळते तेव्हांच त्याला बाहेरच्या व आंतल्या जगाच्या सत्य स्वरूपाचें दर्शन होऊन त्याचें जीवन कृतार्थ किंवा सफल होतें आणि त्याला खऱ्या व शाश्वत सुखाची प्राप्ति होते व शान्ति मिळते. असें होणें म्हणजेच माणसाचा उदय होणें होय; व असाच 'उदय' या शब्दाचा खोल व खरा अर्थ आहे.

सर्वोदय शब्दाचा जो इतिहास आहे तो पाहिला, तर वरील अर्थच सिद्ध होतो. सर्वोदय शब्द ज्या ज्या अर्थानें आपण आज वापरतों, त्या अर्थानें तो पूर्वीं रूढ होता किंवा नाहीं हें आज नक्की सांगणें कठिण आहे; मात्र सर्वोदय ह्या शब्दांतील कल्पना फार प्राचीन असून जगांतील सर्व धर्मांत व सत्पुरुषांच्या जीवनांत ती ओतप्रोत भरलेली आहे. उदाहरणार्थ,

सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥

ही ऋषिप्रणीत प्रार्थना शेंकडों वर्षांच्या पूर्वींची आहे. त्याचप्रमाणें भगवद्गीतेंत योग्यांच्या किंवा भक्तांच्या लक्षणांत 'सर्वभूतहितेरताः' असें प्रमुख लक्षण सांगितलें आहे. 'सर्वोदय' हा शब्द गांधीजींनीं काढला असून त्यांनीं तो एका विशिष्ट अर्थानें योजिला आहे. त्याचा इतिहास असा :

दक्षिण आफ्रिकेंत असतांना गांधीजी एकदां जोहान्सबर्गहून (ट्रान्सवाल) डरबानला (नाताळ) जाण्यासाठीं रात्रीच्या गाडीनें निघाले असतां त्यांचे मित्र श्री. पोलक यांनीं त्यांच्या हातांत वाचण्यासाठीं म्हणून एक पुस्तक ठेविलें. गांधीजी आपल्या आत्मचरित्रांत लिहितात, "मीं तें पुस्तक एकदां वाचण्यास सुरुवात केली, तें संपविल्याशिवाय खालीं ठेवणें मला शक्य झालें नाहीं. त्यानें माझ्या मनाची अगदीं पकड घेतली. जोहान्सबर्गपासून तों डरबानचा प्रवास २४ तासांचा होता, गाडी संध्याकाळीं डरबानला पोंचली. त्या रात्रीं मला मुळींच झोंप आली नाहीं. त्या पुस्तकांत ज्या ध्येयवादाचा पुरस्कार केला होता, त्याप्रमाणें स्वतःचें जीवन सुरू करण्याचा मीं तावडतोब निश्चय केला."

ज्या पुस्तकानें गांधीजींच्या जीवनावर एवढा महान् परिणाम केला, तें पुस्तक दुसरें कोणतें नसून रस्किनचें 'अन् टु धिस् लास्ट' हेंच होतें. म. गांधींनीं स्वतः या पुस्तकाचा सारांशरूपानें अनुवाद केला व या अनुवादाला 'सर्वोदय' असें नांव त्यांनीं दिलें. या अनुवादाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत गांधीजी लिहितात, "रस्किनच्या पुस्तकाचा मीं शब्दशः अर्थ केला नसून त्याचा फक्त सारांश दिला आहे. शब्दशः अर्थ केला, तर संभव आहे, बायबलादि ग्रंथांतील पुष्कळसे दृष्टान्त वाचकांना समजणार नाहींत. पुस्तकाच्या मूळ इंग्रजी नांवाचाहि मीं शब्दशः अनुवाद केलेला नाहीं. कारण, ज्यांनीं बायबल वाचलें आहे त्यांनाच तो समजूं शकेल. परंतु हें पुस्तक लिहिण्याचा उद्देश सर्वांचें कल्याण, सर्वांचा (केवळ अधिकांशाचा नव्हे) उदय, उत्कर्ष हा असल्यामुळें, मीं 'सर्वोदय' असें नांव त्याला दिलें आहे."

गांधीजी याच प्रस्तावनेंत पुढें लिहितात, "पाश्चिमात्य देशांत साधारणतः असें समजलें जातें, कीं बहुसंख्याक लोकांचें सुख साधणें, त्यांचा अभ्युदय करणें हेंच माणसाचें कर्तव्य आहे. सुखाचा अर्थ केवळ शारीरिक सुख, केवळ पैशापासून मिळणारें सुख असा केला जातो. असें सुख प्राप्त करतांना नीतिनियमांचा भंग झाला, तरी त्याची विशेष पर्वा केली जात नाहीं. अशा रीतीनें बहुसंख्याक लोकांना सुख देणें हें ध्येय डोळ्यांपुढें ठेविल्यामुळें पश्चिमेकडील देशांतील लोक पुष्कळांना सुख देण्यासाठीं थोड्यांना दुःख देणें हा अधर्म मानीत नाहींत. याचा परिणाम पश्चिमेकडील देशांत आपणांस सर्वत्र पहावयास मिळतो.

" परंतु पश्चिमेकडील विचारवंत लोक असें मानतात, कीं बहुसंख्याकांच्या आर्थिक व शारीरिक सुखासाठींच प्रयत्न करणें हा कांहीं ईश्वरी नियम नाहीं. आणि एवढाच प्रयत्न करणें व त्यासाठीं नीति-नियमांचा भंग करणें हें ईश्वरी नियमाच्या विरुद्ध आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे, कीं माणसाचें सुख किंवा उदय म्हणजे त्याला केवळ शारीरिक सुखाचा व भौतिक संपत्तीचा लाभ होणें असा नसून, त्याला आत्मिक सुखाचा व उन्नतीचाहि लाभ होणें, हाच त्याचा खरा अर्थ आहे."

रस्किनचें ' अन् टु धिस् लास्ट ' हें पुस्तक गांधीजींनीं दाक्षिण आफ्रिकेंत असतांनाच वाचलें होतें व त्या पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें त्यांनीं तेथेंच आपलें जीवन सुरू केलें होतें. पण त्यानंतर सर्वोदयांतील ध्येयवादाचा व जीवनपद्धतीचा त्यांनीं दक्षिण आफ्रिकेंत अगर भारतांत सर्वोदयाच्या नांवानें प्रत्यक्ष प्रचार केला नाहीं हें खरें. जेव्हां लोक त्यांना ' तुम्ही ज्या स्वराज्यासाठीं आंदोलन करीत आहांत, तें स्वराज्य कोणतें ' असा प्रश्न करीत, तेव्हां गांधीजी ' प्रातिनिधिक लोकशाही पद्धतीचें स्वराज्य ' असें नेहमीं उत्तर देत. पण ज्याप्रमाणें आकाश सर्वत्र गच्च भरलेलें असतें, त्याचप्रमाणें गांधीजी सर्वोदयाच्या नांवाचा उच्चार नेहमीं करीत नसले, तरी त्यांचे सर्व कर्म-व्यापार त्यांच्या देशबांधवांच्या ध्यानांत आले होते, हें खालील गोष्टीवरून ध्यानांत येईल.

गांधीजींचें ध्येय व कार्यक्रम ह्यांचा प्रचार करण्यासाठीं गांधी-सेवा-संघातर्फे जें मासिक सुरू झालें, त्याचें नांव ' सर्वोदय ' असेंच ठेवण्यांत आलें. गांधीजींचा अमानुष वध झाल्यानंतर त्यांचे प्रमुख स्नेही, सहकारी व अनुयायी जेव्हां सेवाग्रामला जमले, तेव्हां गांधीजींचें कार्य पुढें चालविण्यासाठीं त्यांनीं ' सर्वोदय-समाज ' स्थापन करण्याचें व तद्द्वारा गांधीजींचें कार्य पुढें चालविण्याचें ठरविलें.

गांधीजींच्या ध्येयानें प्रेरित झालेल्या व प्रत्यक्ष त्यांच्याच हाताखालीं काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनीं ३० जानेवारी १९४९ रोजीं जी आर्थिक योजना प्रसिद्ध केली, ती ' सर्वोदय-योजना ' याच नांवानें प्रसिद्ध केली. कॉंग्रेस कमिटीनें गांधीजींची पहिली श्राद्ध-तिथि ' सर्वोदय-दिन ' म्हणून पाळली जावी असा आदेश देशास दिला.

सद्भावना किंवा सज्जनता सर्व श्रेणींच्या माणसांचा वारसा असून कोणीहि मनुष्य कितीहि पतित झालेला दिसला, तरी सज्जनतेनें व सद्भावनेनें त्याच्याशीं व्यवहार केला, तर त्याचा उद्धार किंवा उदय झाल्याशिवाय राहणार नाहीं; व म्हणून सर्वांच्या कल्याणासाठीं माणसानें प्रयत्न करावा ही सर्वोदयाची श्रद्धा आहे.

आतां रस्किनच्या ‘ अन् टु धिस् लास्ट ’ या पुस्तकाचा सारांश काय आहे हें प्रकरणशः पाहूं.

●●●

# आपल्या प्रस्तावनेंत रस्किन काय म्हणतो ?

रस्किननें आपले हे चार निबंध जेव्हां पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले, तेव्हां त्याच्या प्रस्तावनेंत तो लिहितो, कीं हे चार निबंध लिहिण्यांत माझा पहिला हेतु संपत्तीची तर्कशुद्ध व अचूक व्याख्या करणें हा असून दुसरा हेतु कांहीं विशिष्ट नीति-नियमांचें पालन करूनच संपत्ति संपादन करणें शक्य आहे व या नीति-नियमांपैकीं प्रधान नियम म्हणजे प्रामाणिकपणा म्हणून कांहीं गुण असून व्यवहारांत तो गुण साध्य करणें शक्य आहे अशी श्रद्धा असणें हा होय. प्रामाणिकपणा हा कांहीं सर्वोच्च गुण नव्हे असें म्हटलें जातें, व तें खरेंहि आहे. पण सांप्रत हा गुणच अति दुर्मीळ झालेला आहे. जोंपर्यंत आपण या गुणाला आपल्या जीवनांत स्थान देण्याला प्रारंभ करणार नाहीं, तोंपर्यंत इतर गुण अंगीं आणणें तर दूरच राहो, पण आपला परस्परांचा व्यवहार निर्मळ व लाभदायकहि होणार नाहीं. समाजांत ज्या प्रमाणांत प्रामाणिक माणसें वावरत असतील, त्या प्रमाणांत तो समाज जिवंत राहील व उत्कर्ष पावेल. आपले उद्योगपती व व्यापारी जर प्रामाणिकपणानें आपला व्यवसाय चालवितील, तर मजूर-संघटनेचा प्रश्नहि आपोआपच सुटेल.

डॉक्टर, लेखक किंवा सैनिक हे देशाची जितकी सेवा करीत असतात, तितकीच देशाची सेवा कुदळ-खोऱ्यानें काम करणारा मजूरहि करीत असतो. देशांतील प्रत्येक तरुणाला व तरुणीला शिक्षण देणें, त्या शिक्षणांत कोणत्या तरी धंद्याचा अंतर्भाव करणें व त्यांपैकीं प्रत्येकास काम देणें, हें सरकारचें कर्तव्य आहे.

प्रेम व तज्जन्य सद्भावना आणि सहानुभूति हा मनुष्याचा मूल अगर स्थायी भाव असून त्याच्याशीं स्नेहानें व सहानुभूतीनें व्यवहार केला तरच त्याच्यांतील सर्व शक्तींचा व गुणांचा उत्कृष्ट विकास होऊन ते त्याच्या वर्तनांत प्रकट होतात. मनुष्य म्हणजे केवळ शरीर असें गृहीत धरून त्याच्याशीं व्यवहार करणें चूक असून जे तसा करतात, ते पुष्कळ वेळां चुकतात असा अनुभव येतो. मनुष्याला आत्मा आहे व या आत्म्याची शक्ति अनंत आहे. या आत्मशक्तीचा त्याच्या शरीरधर्मावर व कर्मावर सतत परिणाम घडत असतो. जें शास्त्र हें लक्षांत घेत नाहीं, तें व्यक्ति-व्यक्तींतील वा गटा-गटांतील व्यवहाराचें नियमन व अंदाज करण्याला असमर्थ ठरल्याशिवाय राहणार नाहीं. आत्मशक्ति अनंत असल्यामुळें विशिष्ट परिस्थितींत माणसाच्या वर्तनावर तिचे होणारे परिणाम यांचा कांहीं अंदाज करतां आला, तरी त्या बाबतींत कांहींहि निश्चित सांगणें धोक्याचें आहे.

म्हणून मनुष्याचे हितसंबंध परस्पर-विरोधी असले, तरी काल-स्थितिप्रमाणें त्यांच्यांत शत्रुत्व व संघर्ष असलेच पाहिजेत, असें सिद्ध होत नाहीं. कारण स्वार्थ हाच कांहीं माणसाच्या कर्माची एकमेव प्रेरक शक्ति नाहीं. मनुष्य जें कर्म करतो त्याच्या बुडाशीं नाना भाव व हेतू असल्यामुळें विशिष्ट प्रकारच्या वर्तनाचे स्वतःवर व इतरांवर अखेर काय परिणाम होतील, हें समजणें व सांगणें कठिण आहे. पण श्रेय कशांत आहे व प्रेय कशांत आहे, न्याय्य काय व अन्याय्य काय हें आपल्यापैकीं प्रत्येकास समजू शकेल व तें बहुतेकांस समजतेंहि. चांगल्याचा परिणाम चांगलाच झाला पाहिजे, हेंहि माणसाच्या बुद्धीला पटतें. अर्थात् सद्भावनेशिवाय चांगलें किंवा न्याय्य वर्तन शक्य नाहीं म्हणून मनुष्यांनीं परस्परांसंबंधीं सद्भावना धारण करणें हें त्यांचें कर्तव्यच ठरतें. माणसाशीं सद्भावनेनें व्यवहार केला, तर माणसाची आत्मशक्ति जागृत होऊन त्याच्या हातून अगदीं अनपेक्षित अशीं विलक्षण कामें होतात. म्हणून सद्भावनेनें माणसाशीं व्यवहार करणें हें स्वार्थाच्या

दृष्टीनेंसुद्धां शहाणपणाचें आहे. मात्र स्वार्थासाठींच सद्भावना दाखविली, तर तिचे उलट परिणाम होऊन निराशा पदरीं पडण्याचा पुष्कळसा संभव आहे; नव्हे, खात्री आहे. सद्भावनेसाठींच सद्भावना ह्याच चांगल्या किंवा न्याय्य व्यवहाराचा मूळ पाया आहे असें समजून माणसें तशीं वागतील, तर त्यांत त्यांचा स्वार्थ आपोआप सिद्ध होईल. मात्र स्वार्थ हा हेतु असतां कामा नये.

शेती व उद्योगधंदे ह्या अर्थोत्पादनाच्या क्षेत्रांशिवाय अन्य बहुतेक क्षेत्रांत आपण माणसा-माणसांतील व्यवहाराच्या मुळाशीं प्रेम व सद्भावना आहे असें मानतों व म्हणून या क्षेत्रांत वावरणाऱ्या अगर व्यवहार करणाऱ्या व्यक्तींना आपण मान देतों. याचा अर्थ हा व्यवसाय करणाऱ्या माणसानें अर्थ संपादन करूं नये, असें आपण समजत नाहीं. मात्र अर्थ संपादन करणें हा या व्यवहाराचा अगर व्यवसायाचा मुख्य हेतु असतां कामा नये व तो तसा नसतो अशी आपली भावना असते. अशा व्यवहाराचा अगर व्यवसायाचा प्रधान हेतु समाजोपयोगिता हा असला पाहिजे व तो तसा आहे असें आपण समजतों. अर्थसंपादन हा केवळ गौण हेतु आहे. व्यवहार अगर व्यवसाय उत्तम रीतीनें चालविण्यासाठीं तो जरूर म्हणूनच आहे असें आपण मानतों. समाजाच्या उपयोगी पडणें हा प्रधान हेतु व अर्थसंपादन हा गौण हेतु असल्यामुळें हे व्यवसाय अखेर त्यागवृत्तीवर आधारलेले आहेत असें आपण समजतों, व पुष्कळ वेळां तसा अनुभवहि येतो. उदाहरणार्थ, सैनिक जरूर तेव्हां स्वतःच्या प्राणाचा बळी देऊनहि आपल्या लोकांचें रक्षण करतो.

उलट, अर्थोत्पादनाच्या क्षेत्रांत जे काम करतात त्यांचा प्रधान हेतु अर्थ संपादन करणें आहे, असें हल्लींचें अर्थशास्त्र मानतें व म्हणून स्वार्थभावना हीच या व्यवसायाच्या मुळाशीं आहे व असली पाहिजे असें तें प्रतिपादितें. येथें सद्भावना व सहानुभूति यांचें काम नाहीं, त्यांनीं प्रेरित होऊन जो काम करील त्याचा अर्थ बुडेल, असें हें शास्त्र शिकवितें; व या क्षेत्रांत काम करणारे लोक साधारणपणें असेंच समजून परस्परांशीं वर्तन करतात. या क्षेत्रांत धर्म व नीतीचा प्रवेश होईल तर नुकसान होईल, अशी त्यांची प्रामाणिक समजूत असते. जेथें धर्म व नीति नाहीं व जेथें केवळ स्वार्थाचेंच साम्राज्य चालतें, तेथें त्यागाचें नांवहि नसेल तर नवल काय ? कारखानदार

अगर व्यापारी किंवा शेतीचा मालक स्वतःच्या स्वार्थासाठींच सर्व करीत असतो, असें मजूर मानतात व म्हणून त्यांच्या मनांत मालकाबद्दल सद्भावना व सहानुभूति वास करीत नाहीं व म्हणून कामांत त्यांचें खरें मन नसतें. सर्वसाधारण जनताहि हे व्यवसाय करणारे लोक आपल्यासाठीं त्याग करणार नाहींत, हें ओळखून त्यांना मनांतून मान देत नाहीं.

मालक व मजूर यांच्यामध्यें सदा संघर्ष दिसतो, त्याचें खरें कारण त्याचे हितसंबंध परस्परांशीं विरोधी आहेत हें नव्हे, तर मालकाचा मजुरांशीं जो संबंध व व्यवहार असतो तो स्वार्थमूलक असतो, हें होय. मजुरांच्या बाबतींतहि हाच नियम सद्यःस्थितींत क़ांहीं अंशानें लागू करतां येईल.

म्हणून हा संघर्ष टाळावयाचा असेल, तर मालक व मजूर आणि धंदेवाले व गिऱ्हाईक यांच्यामधील संबंध सद्भावनेच्या व सहानुभूतीच्या पायावर उभारले पाहिजेत व ते तसे उभारले जाण्यासाठीं ज्या पद्धतीला स्वार्थसाधनेचें स्वरूप नाहीं, अशी उद्योगधंदे व व्यापार करण्याची पद्धति शोधून काढली पाहिजे; नव्हे, अशा व्यापार-पद्धतीच्या व्यतिरिक्त दुसरी कोणतीहि व्यापाराची खरी पद्धति असूंच शकत नाहीं, असें सर्वांनीं समजलें पाहिजे. म्हणजेच अन्य व्यवसायांप्रमाणें हा व्यवसायहि समाजाच्या उपयोगाच्या हेतूनेंच चालविला पाहिजे व अर्थसंपादन हा त्याचा गौण हेतु झाला पाहिजे. हें तत्त्व एकदां मान्य झालें, कीं हा व्यवसायहि त्यागपूर्वक चालविणें जरूर आहे ही गोष्ट आपोआपच मान्य होईल.

समाजाला शुद्ध स्वरूपांत व स्वस्त भावांत माल पुरविणें व तो निर्माण करण्यांत व त्याची वाहतुक करण्यांत ज्या लोकांना श्रम करावे लागतात त्या सर्वांचें अधिकांत अधिक हित कसें साध्य होईल हें पाहणें, असें मालकाचें दुहेरी कर्तव्य आहे. हीं दोन कर्तव्यें पार पाडण्यास व्यापाऱ्याच्या अंगीं श्रेष्ठ प्रकारची बुद्धिमत्ता, धीर वृत्ति, औदार्य आणि समयज्ञता हे बौद्धिक गुण लागतात. त्याचप्रमाणें हीं कार्यें न्यायानें घडावींत म्हणून प्रसंग येईल तेव्हां एकाद्या सैनिकाप्रमाणें अथवा डॉक्टराप्रमाणें अवश्य तर आपले प्राणहि अर्पण करावेत, हें व्यापाऱ्याचें कर्तव्य असतें. माल पुरविण्याचा आपला व्यवसाय करीत असतां त्यानें दोन गोष्टींकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. दिलेलें वचन त्यानें पाळलें पाहिजे. आपलीं वचनें निष्ठा-

पूर्वक पाळलीं नाहींत, तर कोणताहि व्यापार शक्य होणार नाहीं; आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्यानें पुरविलेला माल निर्दोष व निर्भेळ असला पाहिजे. आपण केलेला करार मोडण्यापेक्षां किंवा आपण दिलेल्या मालांत भेसळ करण्यापेक्षां किंवा हिणकस माल पुरविण्यापेक्षां अथवा अन्यायानें फाजिल किंमत आकारण्यापेक्षां क्लेश, दारिद्य अथवा कष्ट भोगूनहि या दोन तत्त्वांचें पालन त्यानें धिटाईनें केलें पाहिजे.

सध्यां मजुरांच्या वेतनाचे दर कामाच्या कमी-अधिक मागणीप्रमाणें रोज बदलत असतात व व्यापाराच्या तेजी-मंदीस अनुसरून आपली नोकरी गमावण्याची भीति त्यांना प्रत्येक क्षणीं भेडसावीत असते. अशा अनिश्चित परिस्थितींत मनुष्याच्या सद्भावना जागृत राहूं शकत नाहींत; उलट, त्याच्यामधील द्वेषभावनांचाच स्फोट होणें शक्य असतें. म्हणून मजुराच्या जीवनांतील ही अनिश्चितता कायमची काढून टाकली पाहिजे. असें होईल तरच त्याची सद्भावना जागृत होऊन तो व त्याचा मालक यांच्यामध्यें प्रेमाचे संबंध निर्माण होतील व त्यांच्या हातून जास्तींत जास्त श्रम व संपत्ति निर्माण होईल. याचा अर्थ असा, कीं संपत्ति निर्माण करण्याच्या कामांत जे गुंतलेले आहेत, त्यांची मजुरी कामाच्या मागणीप्रमाणें बदलणार नाहीं व व्यापाराची स्थिति कशीहि असली, तरी ठराविक वेतन देऊन मजुरांची संख्या कमी-अधिक होणार नाहीं, अशी उद्योगधंदे व व्यापार चालविण्याची पद्धति कारखानदार व व्यापारी यांनीं शोधून काढली पाहिजे व तिची अंमलबजावणी केली पाहिजे. आणि या कामांत समाजानें त्यांना आपली अनुमति व सहकार्य दिलें पाहिजे.

असें करणें म्हणजे कांहीं विलक्षण गोष्ट करणें होय असें मानण्याचें कारण नाहीं. वस्तुतः जगांतील श्रेष्ठ प्रतीच्या सर्व कामांचे दर असेच निश्चित ठरविलेले असतात. मग ज्या कामावर समाजाच्या अगदीं प्राथमिक व इतर गरजा भागणें अवलंबून आहे, तें काम करणाऱ्या लोकांच्या बाबतींत हा न्याय कां लागू करूं नये, हें समजणें खरोखर कठिणच आहे.

अर्थात् ही गोष्ट घडवून आणावयाची, तर मालकांना व समाजाला प्रारंभीं बरेंच नुकसान व गैरसोय सोसावी लागेल हें खरें; पण जी गोष्ट बिनकष्टानें व तोट्यावांचून करतां येते, तीच गोष्ट अन्तीं हितकर व म्हणून

आवश्यक असते असें, थोडेंच आहे ? उलट, अन्तीं ती अहितकर व म्हणून अनावश्यक ठरण्याची खात्री आहे.

●●●

## संपत्तीचे प्रवाह

निबंध २ रा

आजच्या अर्थशास्त्रज्ञांचा असा दावा आहे, कीं 'श्रीमंत कसें बनावें' हें शिकविण्यासाठीं आमच्या शास्त्राचा जन्म आहे व त्याच्या सिद्धान्तांनुसार जे वर्तन करतात ते श्रीमंत बनतात, व जे त्याचें उल्लंघन करतात ते दरिद्री होतात, असा प्रत्यक्ष अनुभव आहे. ही गोष्ट मान्य केली, तरी त्याबरोबरच आपल्या श्रीमंत बनण्याचे समाजाच्या इतर घटकांवर कसे व कोणते इष्टानिष्ट परिणाम घडतात, याचें या 'श्रीमंत' होणाऱ्यांना अल्पच ज्ञान असतें ही गोष्ट तितकीच खरी. 'श्रीमंत' होणें म्हणजे खरोखर काय होणें हें थोड्याच लोकांना समजतें, व 'श्रीमंती' ही एक सापेक्ष कल्पना आहे, हें लक्षांत घेऊन व्यवहार करणारे क्वचितच आढळतात. अर्थशास्त्रांतील विशिष्ट नियमांचें पालन केलें म्हणजे प्रत्येकास श्रीमंत होतां येईल असा सार्वत्रिक भ्रम असल्याचें आढळून येतें. श्रीमंतीला विरोधी अशी गरिबीचीहि कल्पना आहे हें लक्षांत घेतलें, तर सध्यांच्या अर्थानें समाजांतील प्रत्येक माणसाला श्रीमंत कसें बनतां येईल याचा कोणीच विचार करीत नाहीं, हें एक नवलांतलें नवलच म्हटलें पाहिजे. श्रीमंती ही विद्युच्छक्तीप्रमाणें अशी एक शक्ति आहे, कीं ती विषमतेच्या व आत्मविरोधी शक्तीच्या सहकार्यानेंच आपला प्रभाव दाखवूं शकते. आपल्या खिशांतील पैशांचा प्रभाव आपल्या शेजाऱ्याच्या खिशांत त्याचा अभाव असेल तरच पडूं शकेल. म्हणून 'सामाजिक अर्थशास्त्र' आणि 'व्यापारी अर्थशास्त्र' ह्यांच्यांतील भेद नीट समजावून घेतला पाहिजे. सामाजिक अर्थशास्त्र (राष्ट्रांचें किंवा राष्ट्रिकांचें अर्थशास्त्र) सुखकर व उपयुक्त वस्तू योग्य वेळीं व योग्य स्थळीं कशा निर्माण कराव्यात, त्या कशा सुरक्षित ठेवाव्यात आणि त्यांचें वितरण कसें करावें, यासंबंधींचें शास्त्र होय. याच्या उलट,

'व्यापारी अर्थशास्त्र' हें एक पैशाचें अगर द्रव्य संपादण्याचें शास्त्र आहे. असा कोणताहि हक्क म्हटला म्हणजे एका पक्षास संपत्ति व सत्ता आणि दुसऱ्या पक्षास तितक्याच प्रमाणांत दैन्य व ऋण प्राप्त होणें, असा या शास्त्राचा अर्थ आहे.

म्हणून अशा श्रीमंतीमुळें ज्या राष्ट्रांत ती असेल, त्या राष्ट्रांची प्रत्यक्ष संपत्ति किंवा तेथील लोकांचें हित अधिक वाढलें असेल, असें निश्चितपणें म्हणतां येत नाहीं. पण अशा प्रकारची व्यापारी संपत्ति अथवा इतरांच्या श्रमावरील सत्ता, हिचें रूपान्तर खऱ्या संपत्तींत प्रायः नेहमींच करतां येतें. पण खऱ्या संपत्तीचें रूपान्तर दुसऱ्याच्या श्रमावरील सत्तेंत नेहमींच करतां येतें असें नाहीं. यामुळें सुधारलेल्या राष्ट्रांतील धंदेवाल्या लोकांत 'श्रीमंती' या शब्दाचा अर्थ सामान्यतः 'व्यापारी संपत्ति' असा केला जातो. ही मनोवृत्ति रूढ होण्याचें आणखीहि एक कारण आहे. तें म्हणजे एकाद्यापाशीं खऱ्या मालमत्तेचा पुष्कळ संचय झालेला असला, तरी त्याचबरोबर दुसऱ्याचे श्रम विकत घेण्याची व्यापारी सत्ता त्याच्या हातीं जर नसेल, तर त्याला आपल्या मालमत्तेचा फारसा उपयोग करतां येत नाहीं. अशा स्थितींत माणूस मालदार असूनहि त्याला एकाद्या गरीब माणसाप्रमाणेंच कष्टाचें व साधें जीवन घालवावें लागेल. नोकर, व्यापारी आणि कलावंत यांचे श्रम आपल्या सुखासाठीं विकत घेण्याची सत्ता असावी, हें या श्रीमंतीचें अगदीं साधें स्वरूप होय. राष्ट्रांतील मोठ्या जनसमुदायाकडून हितकारक, क्षुद्र, अथवा हानिकारक, असे वाटतील ते धंदे आपल्या इच्छेप्रमाणें करवून घेण्याची सत्ता सधन लोकांस असावी, हा या श्रीमंतीचा अधिक व्यापक असा अर्थ आहे. अर्थात् श्रीमंतीपासून प्राप्त होणारी ही सत्ता ज्यांच्यावर ती गाजवावयाची ते जितक्या प्रमाणांत कमी-अधिक दरिद्री असतील, तितक्या प्रमाणांत कमी अथवा अधिक होत असते. म्हणून 'श्रीमंत होण्याची कला' या शब्दांत केवळ आपणापाशीं मोठा द्रव्यसंचय करण्याची कला, एवढाच अर्थ सामान्यतः अभिप्रेत नसून 'आपल्या शेजाऱ्यापाशीं कमी धन असेल अशी परिस्थिति निर्माण करण्याची कला' हाहि अर्थ अंतिम दृष्ट्या त्यांत अंतर्भूत होत असतो. अशा प्रकारची सामाजिक विषमता निर्माण होणें राष्ट्राला हितकारक आहे कीं अहितकारक

आहे, याचा निर्णय केवळ तात्त्विक दृष्टीनें करतां येणार नाहीं. सामान्य लोकांत जे अनेक अर्थशास्त्रीय हेत्वाभास रूढ आहेत, त्यांच्या बुडाशीं अशी आर्थिक विषमता ही नेहमींच हितप्रद असते, हें अविवेकी व हास्यास्पद गृहीतकृत्य असल्याचें प्रायः दृष्टीस पडतें. यासंबंधींचा त्रिकालाबाधित व अपरिहार्य नियम असा आहे, कीं ही विषमता कशा मार्गानें निर्माण करण्यांत आली आहे, आणि त्या विषमतेचा उपयोग कोणत्या उद्देशानें करण्यांत येत आहे, या दोन गोष्टींवर तिचें हितकारित्व अवलंबून असतें. अन्यायांतून उत्पन्न होणारी सांपत्तिक विषमता निर्माण होत असतां त्या राष्ट्राची हानि होत असते. तसेंच अन्याय करण्याच्या कामीं तिचा उपयोग होत असेल, तर ती अस्तित्वांत असेपर्यंत तिच्यामुळें त्या राष्ट्राची अधिकच हानि होत राहील. पण न्याय्य व्यवहारांतून उत्पन्न होणारी सांपत्तिक विषमता निर्माण होत असतां आणि उदात्त दृष्टीनें तिचा उपयोग केला, तर तिच्या स्थितिकालींहि तिच्यामुळें अधिकच हित होऊं शकतें. म्हणजे जर राष्ट्राचे आर्थिक व्यवहार सुव्यवस्थित आणि त्यांतील लोक उद्योगी असतील, तर त्याच्या निरनिराळ्या गरजा भागविण्याच्या कामांत व्यक्तींच्या विशिष्ट शक्तींचा उपयोग होईल अशा प्रकारें निरनिराळ्या लोकांच्या आंगच्या कार्यक्षमतेची पूर्ण कसोटी लागून जी सामाजिक अवस्था निर्माण होईल, तींत विषमता असली तरी ती सुसंवादी असेल; कारण प्रत्येकास आपआपल्या कामाप्रमाणें व दर्जाप्रमाणें सत्ता व संपत्ति यांचा लाभ होत राहील. याच्या उलट, राष्ट्रांतील लोक निरुद्योगी व राज्यपद्धति अव्यवस्थित असेल, तर उच्चनीच भाव त्या राष्ट्राच्या विकृतीचे निदर्शक असतील, त्यांत मिळणारें यश समाजद्रोहावर आधारलेलें असेल, व त्याच्यापासून त्या राष्ट्रांतहि आर्थिक वैभव आणि दास्यावस्था यांच्यावर आधारलेले अव्यवस्थित श्रेष्ठ-कनिष्ठ संबंध निर्माण होतील. पण पहिल्या प्रकाराच्या राष्ट्रांतील सुसंवादी श्रेष्ठ-कनिष्ठतेहून ही विषमता भिन्न असेल, त्यांतील श्रेष्ठत्व अन्याय-निदर्शक आणि कनिष्ठत्व गुन्हेगारीचें व दुर्दैवाचें निदर्शक असेल; समाजाच्या विशिष्ट अंगांत होणारा विकृत धनसंचय, समाजशरीरांतील उत्पादनशक्ति अखेरीस क्षीण बनविल्याखेरीज रहात नाहीं. त्याचप्रमाणें दुसऱ्यांच्या श्रमावर हक्क निर्माण करणाऱ्या व्यापारी संपत्तीची

समाजांत वाढ होणें म्हणजे मालमत्तारूपी खऱ्या संपत्तीची त्या समाजांत वाण पडणें होय, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे.

म्हणून एकाद्या समाजाच्या अगर देशाच्या संपत्तीचें मोजमाप करतांना ती संपत्ति त्यानें कशी मिळविली आहे, त्याच्यावर तो समाज अगर देश संपन्न आहे किंवा नाहीं हें ठरविणें आवश्यक आहे; एकाद्या सांठलेल्या संपत्तीकडे केवळ पाहून तिच्यामुळें त्या राष्ट्राचें हित होणार आहे कीं अहित होणार आहे, याचा निर्णय करणें शक्य नसतें. बीजगणितांतील संख्येच्या पाठीमागें धन किंवा ऋण जें चिह्न असेल, तें पाहून आपण तिची किंमत ठरवितों, त्याचप्रमाणें या संपत्तीच्या मागें कोणतें नैतिक चिह्न आहे हें पाहून आपणांस तिचें खरें मूल्य ठरवावें लागेल. एकादी विशिष्ट व्यापारी संपत्ति प्रामाणिक उद्योग, वाढती श्रमशक्ति आणि उत्पादक संशोधन यांची निदर्शक असूं शकेल, किंवा विनाशक विलास, निष्ठुर जुलूम आणि विघातक वंचना यांचीहि निदर्शक असूं शकेल. धनसंचयाच्या अंगीं असणारे हे गुण केवळ नैतिक किंवा काल्पनिक असून त्यांच्याकडे श्रीमान् होऊं इच्छिणाऱ्या मनुष्यास वाटेल तेव्हां दुर्लक्ष करतां येईल, असें समजूं नका. संपत्तीच्या आंगचे हे गुण अगदीं यथार्थतेनें भौतिक असेच आहेत. त्यामुळें प्रत्येक धनसंचयाचें मूल्य इतक्या मोठ्या प्रमाणांत कमी-अधिक होत असतें, कीं त्याची गणनाहि करतां येणार नाहीं. धनसंपादनाचे कांहीं कांहीं प्रकार असे असतात, कीं त्यांच्यामुळें ते संपादन करणारांना मिळणाऱ्या संपत्तीहून दसपट संपत्ति इतरत्र निर्माण होऊं शकते. याच्या उलट, कांहीं प्रकारांमुळें तितक्याच पटीनें सामाजिक संपत्तीचा विनाश होत असतो आणि म्हणून धनसंपादन-कार्याच्या नैतिक स्वरूपाकडे दुर्लक्ष करून धनार्जनाच्या मार्गासंबंधीं समाजाला उपदेश करतां येईल किंवा खरेदीचे व नफा मिळविण्याचे सामान्य तांत्रिक नियम एकाद्या राष्ट्रास सांगतां येतील, अशी कल्पना करणें याहून लोकांना दुर्मार्गवर्ती बनवणारी उन्मादक भूल दुसरी कोणतीहि आढळणार नाहीं. " जेथें स्वस्तांत स्वस्त माल मिळेल तेथें तो खरेदी करा व जेथें महागांत महाग विकला जाईल तेथें तो नेऊन विका " या आधुनिक व्यापारशास्त्रांतील सूत्राइतकी मानवी बुद्धीला लज्जास्पद दुसरी कल्पना कोठल्याहि इतिहासांत अद्यापि मला आढळलेली नाहीं. राष्ट्रीय

अर्थशास्त्राला सम्मत असें वर्तनतत्त्व म्हणून त्याचा केव्हांहि पुरस्कार करतां येणार नाहीं. माल स्वस्त किंवा महाग होण्याचीं कारणें तुम्हांला समजतीलच असें नाहीं. हीं कारणें प्रारंभीं वा अन्तीं ज्या समाजांत तुम्ही राहतां त्या समाजाला म्हणजेच तुम्हांला अहितकारक वा विनाशाला नेणारींहि असूं शकतील. म्हणून माणसाला एक गोष्ट कळणें शक्य आहे आणि ती म्हणजे त्याचा विशिष्ट व्यवहार न्यायाचा व प्रामाणिकपणाचा होता किंवा नाहीं. या बाबतींत एवढ्याच गोष्टींचा माणसानें विचार केला तरी पुरे आहे. जगांतील मारामाऱ्या व लुटालुटी बंद होतील अशी अवस्था प्राप्त होण्यासाठीं मला जेव्हां करतां येणें शक्य होतें तेव्हां मीं केलें आहे, अशी खात्री तेवढ्यानें मनुष्यास बाळगतां येईल. सारांश, आर्थिक व्यवहारांतील प्रश्न अखेरीस न्यायप्रस्थापनेच्या प्रश्नांत जाऊन विलीन होतात. थोडक्यांत म्हणजे पैशाच्या अंगचा मुख्य गुण किंवा त्याची खरी किंमत म्हणजे त्यामुळें इतर माणसांवर मिळणारी सत्ता हीच होय. ही सत्ता न मिळेल, तर भौतिक मालमत्ता केवढीहि मोठी असली तरी निरुपयोगी होईल. आणि ज्याला अन्य मार्गानें अशी सत्ता प्राप्त करून घेतां येईल, त्यास सापेक्ष दृष्ट्याहि पैशाची सत्ता अनावश्यक ठरेल. मानवी प्राण्यावर पैशावांचून अशी सत्ता मिळूं शकते. मागें मीं म्हटल्याप्रमाणें पैशानें मिळणारी सत्ता ही नेहमींच अपूर्ण व संशयी असते. पुष्कळ गोष्टी अशा आहेत, कीं त्या पैशाच्या आटोक्यांत येऊं शकत नाहींत; व इतर अनेक अशा आहेत, कीं ज्या पैशानें आपण राखूं शकत नाहीं. सोनें देऊन विकत न मिळणारीं अशीं अनेक प्रकारचीं सुखें मनुष्यें एकमेकांना देऊं शकतात, व त्यांच्यामध्यें अशा अनेक प्रकारच्या निष्ठा आढळतात, कीं ज्यांचें मूल्य सोन्यानें मोजतां येणार नाहीं. जेथें पैसा काम करीत नाहीं, तेथें सद्‌गुण अगर नैतिकशक्ति काम करूं शकते हें तत्त्व, मालक मजुरांशीं व्यवहार करतांना मान्य करतील व अमलांत आणतील, तर केवढें काम होईल! त्यामुळें या क्षेत्रांत आज सर्वत्र दिसत असलेला घोर संघर्ष थांबून राष्ट्राच्या खऱ्या संपत्तीची वृद्धि होईल.

माणसापासून काम घेण्याची शक्ति म्हणजेच खरी संपत्ति, हें तत्त्व सिद्ध झालें व मान्यहि झालें, तर माणसें ज्या मानानें अधिक शहाणीं व नीतिमान् होतील, त्या मानानें संपत्तीचें माप वाढेल ही गोष्ट आपल्याला

सहज समजेल आणि एकदां आपल्याला ही समजली, कीं मग सोनें हीं संपत्ति नसून माणसें हीच खरी संपत्ति होय, हें आपल्या लक्षांत येण्याला कितीसा अवधि लागेल? संपत्तीचा शोध पृथ्वीच्या पोटांत करावयाचा नसून माणसाच्या हृदयांत करावयाचा आहे. आणि ही गोष्ट खरी असेल, तर अर्थशास्त्राचा खरा हेतु शरीरानें व मनानें माणसें सुदृढ बनून उत्साहानें भारलीं जातील, हा असला पाहिजे.

## ऐहिक न्यायदान

निबंध ३ रा

इसवी सनापूर्वीं कित्येक शतकें एक ज्यू व्यापारी होऊन गेला. त्यानें खूप संपत्ति मिळविली होती व व्यवहारदक्ष व्यापारी म्हणूनहि त्याची सर्वत्र ख्याति झाली होती. आर्थिक व्यवहारासंबंधीं कांहीं सर्वसामान्य सूत्रें आणि तत्त्वें त्यानें आपल्या कीर्दीच्या वह्यांत नमूद करून ठेवलेलीं असून तीं अद्याप टिकून राहिलेलीं आहेत.

त्याचें एक सूत्र असें आहे कीं, " ज्याच्या दृष्टीपुढें खोटें बोलून संपत्ति मिळविण्याचें आमिष नाचत असतें, ते मृत्यूचाच पाठलाग करीत असतात." अशाच अर्थाचें त्याचें दुसरेंहि एक वचन आहे : " दुष्टपणानें मिळविलेल्या संपत्तीपासून कांहींहि फायदा होत नाहीं; पण न्यायी मनुष्य मृत्यूच्या भीतींतून मुक्त होतो." या दोनहि वचनांत अन्यायानें मिळविलेल्या संपत्तीचा खरा परिणाम अथवा अंतिम फल मृत्यु किंवा विनाश हेंच असल्याचें सांगितलें आहे, हें घेण्याजोगें आहे. या वचनांत " खोटें बोलून " याऐवजीं " खोटीं लेबलें, खोटीं नावें, ढोंग अथवा जाहिरातबाजी इत्यादींच्या साहाय्यानें " असे शब्द घातले, तर आधुनिक व्यापारी व्यवहाराशीं या वचनाचा काय संबंध आहे, तें आपल्या स्पष्टपणें नजरेस येईल. अशा प्रकारच्या व्यवहारांतील मानवी खटाटोपांस " मृत्यूचा पाठलाग " हें त्यानें दिलेलें नांव साजतें. काळ आपल्या मागें लागला आहे असें आपण समजतों; पण वस्तुस्थिति अशी आहे, कीं नाना प्रकारानें मोहित होऊन आपणच मृत्यूच्या मागें धांवत

असतों. तो व्यापारी पुढें म्हणतो, "जे आपलें धन वाढविण्यासाठीं गरिबांवर जुलूम करतील, ते निश्चित दारिद्री होतील." पुनः तो लिहितो, "एकादा मनुष्य गरीब आहे, म्हणून त्याला लुटूं नका. कारण जे दुसऱ्याला दुर्गतीला नेतात. त्यांना परमेश्वर दुर्गति देतो."

गरिबाला तो गरीब आहे म्हणून लुटणें ही व्यापारी स्वरूपाची एक चोरीच आहे. एकाद्या मनुष्याच्या अडचणीचा फायदा घेऊन त्याची श्रमशक्ति किंवा मालमत्ता कमी भावानें विकत घेणें, ही गोष्ट याच सदरांत पडते. दरवडेखोरांच्या दरवड्याचा नेहमींचा प्रकार याच्या अगदीं विरुद्ध असतो. तो श्रीमंताला श्रीमंत म्हणून लुटीत असतो. पण व्यापारांत गरिबाला लुटण्यांत येते. हा ज्यू व्यापारी म्हणतो, "श्रीमंत आणि गरीब हे एकमेकांसमोर उभे आहेत. परमेश्वरच त्यांचा निर्माता आहे व तोच त्यांना ज्ञान व प्रकाश देतो." श्रीमंतांचें गरिबांशिवाय व गरिबांचें श्रीमंतांशिवाय चालत नाहीं. ते एकमेकांचें अन्न आहेत म्हणा अगर पूरक आहेत म्हणा. ते जेव्हां एकमेकांचें अन्न बनतात, तेव्हां त्याचे विपरीत व अनिष्ट परिणाम होतात; व जेव्हां ते एकमेकांचे पूरक बनतात, तेव्हां त्याचे जीवनदायी असे इष्ट परिणाम घडतात.

संपत्ति ही नदीसारखी आहे. नदीचा प्रवाह समुद्राकडे म्हणजे उताराकडे वाहत असतो, त्याचप्रमाणें संपत्तीचा प्रवाहहि जिकडे जरूर तिकडे म्हणजे गरिबांकडे वाहील, तर तो जीवनदायी व सुखकारक होईल. संपत्ति मिळविणें एवढाच अर्थशास्त्राचा हेतु आहे असें मानणें ही भूल आहे. संपत्तीची न्याय्य व जीवनदायी वांटणी करणें हासुद्धां अर्थशास्त्राचा हेतु असला पाहिजे. चोऱ्या करून अगर दरवडे घालून श्रीमंत होणें आपण अधर्म व पाप समजतों. लोकांच्या अन्नांत व जीवनोपयोगी वस्तूंत अन्य पदार्थांची भेसळ करून त्या विकणें हें सुद्धां लोकांना विष देऊन श्रीमंत होण्याइतकेंच दुष्टपणाचें आहे. 'कायदेशीर व न्याय्य मार्गानें' संपत्ति मिळविणें असें हल्लीचे अर्थशास्त्रज्ञ म्हणतात. पण त्यांत 'कायदेशीर' या शब्दापेक्षां 'न्याय्य' या शब्दाला अधिक महत्त्व आहे. कारण मुळींच न्याय्य नसणारे कांहीं व्यवहारहि कित्येक राष्ट्रांत अर्थात् कित्येक राज्यकर्त्यांच्या आमदानींत, किंवा कांहीं वकिलांच्या साहाय्यानें 'कायदेशीर' ठरूं शकतात. म्हणून जर आपल्या व्याख्येंत अखेरीस 'न्याय्य'

हा एकच शब्द आपण ठेवला, तर एका छोट्या शब्दाच्या भरीनें आमच्या अर्थशास्त्राच्या व्याकरणांत मोठाच फरक पडणार आहे. कारण, मग आपणांस शास्त्रीय मार्गानें श्रीमंत व्हावयाचें असेल, तर आपण तसें न्याय्य मार्गानेंच बनलें पाहिजे, असें सिद्ध होईल. अर्थात् न्याय्य म्हणजे काय, याचें ज्ञान करून घेणें आपणांस अवश्य होईल. म्हणून न्यायबुद्धि म्हणजे काय हें शिकणें माणसाचें प्रथम कर्तव्य होय. केवळ आपण केलेल्या कायद्यांनीं काम करणें अथवा व्यापार करणें एवढ्यानें भागणार नाहीं किंवा न्याय केल्यासारखें होणार नाहीं. पुष्कळ वेळां हा न्याय मात्स्यन्यायाप्रमाणेंच होईल. मोठा मासा लहान माशाला खातो, हा निसर्गाचा नियम अथवा न्यायच आहे. पण मनुष्य हा निसर्गांतीलच एक प्राणि असून तोहि निसर्गाच्या नियमांनीं बांधलेला आहे; नव्हे, त्या नियमांचें पालन करण्यांतच त्याचें हित आहे असें आपण समजूं व त्याप्रमाणें परस्परांशीं व्यवहार करूं, तर ईश्वरानें मनुष्यास ज्ञान किंवा न्याय किंवा विवेकबुद्धि दिली आहे, त्यांचा विशेष उपयोग त्यानें केला असें होणार नाहीं. या ज्ञान किंवा विवेकदीपाच्या प्रकाशांत मनुष्य जो व्यवहार करतो तोच त्याच्या बाबतींत न्याय्य व्यवहार होतो. आणि मनुष्य जेव्हां इतरांशीं असा न्याय्य व्यवहार करतो तेव्हांच तो ‘ मनुष्य ’ या पदवीला प्राप्त होतो व त्याचा व्यवहार प्राणिमात्राला सुखकारक व हितकारक ठरतो.

आतां आपल्याला श्रमाचा न्याय्य मोबदला म्हणजे काय, हें ठरविलें पाहिजे.

आपण एकाद्या मनुष्यास एकादें काम करावयास सांगितलें, तर तें करण्याबद्दल तो मोबदला मागेल, अथवा तें तो मोफतहि करील. मोफत केलेल्या कामाचा प्रश्न येथें उपस्थितच होत नाहीं; कारण तो स्नेहाचा प्रश्न आहे, सौद्याचा नव्हे. पण त्यानें त्याबद्दल मोबदला मागितला आणि त्याच्याशीं न्यायीपणानें वागण्याची आपली इच्छा असली, तर तो आपल्या कामासाठीं जितका काळ, जितकी शक्ति आणि जितकें कौशल्य खर्च करील, तितकें आपणहि त्याच्या पदरांत टाकणें हाच न्याय होय, हें उघड आहे. न्याय्य मोबदल्याच्या या साध्या मूलभूत कल्पनेला एकाच कारणामुळें कमीपणा प्राप्त होत असतो. तें कारण असें, कीं ज्याप्रमाणें बीं पेरलें असतां त्याला फल येतें, त्याचप्रमाणें योग्य दिशेनें श्रम केल्यास त्यालाहि फल प्राप्त होत

असतें. ( यालाच वृद्धि किंवा व्याज म्हणतात. ) म्हणून जो मनुष्य श्रम करतो त्याला त्याचा मोबदला कांहीं काळानें मिळावयाचा असल्यास त्या वृद्धीचा विचार करून त्यांत कांहीं भर टाकण्यांत आली पाहिजे. आज केलेल्या श्रमाचा मोबदला वर्षअखेरीस अथवा विशिष्ट मुदतीनंतर मिळावयाचा असेल, तर त्या गोष्टीचा ढोबळ मानानें हिशेब करतां येईल. परंतु पैशांत मोबदला दिल्यास त्यांत कालावधीच्या प्रश्नाचा विचार येत नाहीं. ( ज्याला पैसा मिळाला असेल, त्यास तो आजच किंवा पुढें केव्हांहि खर्च करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असतें. ) सामान्यतः आपणांस असें गृहीत धरतां येईल, कीं जो मनुष्य दुसऱ्याचें काम आगाऊ करतो व कालावधीनें मोबदला घेतो; त्याला त्याबद्दल कांहीं तरी न्यायाच्या दृष्टीनें अधिक मिळालें पाहिजे. म्हणून या बाबतींतील नमुनेदार व्यवहार पुढीलप्रमाणें असावा असें म्हणतां येईलः माझ्यासाठीं तुम्हीं आज एक तास काम केलें, तर तुम्ही मागाल तेव्हां तुमच्यासाठीं एक तास पांच मिनिटें काम करण्यास मीं तयार असावें. तसेंच तुम्हीं आज मला एक पौंड पाव दिला, तर तुम्ही मागाल तेव्हां मीं १७ औंस पाव द्यावा, इत्यादि. वाचकांनीं इतकेंच लक्षांत घ्यावयाचें, कीं कोणत्याहि कामाबद्दल जो मोबदला द्यावयाचा, त्यामुळें दिलेल्या कामा-इतकें तरी काम मोबदला घेणाराच्या पदरांत पडलें पाहिजे.

तेव्हां मजुरीचे योग्य अथवा न्याय्य दर याची तात्त्विक व्याख्या अशी, कीं मजुरानें जेवढे श्रम मालकाला दिले असतील तेवढे श्रम तरी त्याला तेवढ्या पैशानें केव्हांहि विकत घेतां आले पाहिजेत. थोडेसे अधिकच घेतां यावेत; पण केव्हांहि कमी मिळू नयेत. तसेंच कामाचा हा न्याय्य मोबदला तें काम करण्यास तयार असणाऱ्या लोकांच्या संख्येवर अवलंबून नसावा. मला माझ्या घोड्याला एक नाल बसवावयाचा आहे. तो बसविणारे नालबंद वीस असोत कीं वीस हजार असोत, त्यांच्या संख्येमुळें जो नालबंद तो बसवील त्याच्या कामाच्या न्याय्य मोबदल्यांत रतिभरहि फेरबदल होण्याची आवश्यकता नाहीं. तो बसविण्यास व बनविण्यास त्याला आपल्या आयुष्यांतील दहा-पंधरा मिनिटें खर्च करावीं लागलीं असतील, अमुक इतकें बाहुबल व कौशल्य वेंचावें लागलें असेल, तर मग त्याचा मोबदला म्हणून माझ्या आयुष्यांतील ( किंवा मला देतां येणाऱ्या अशा दुसऱ्या एका

मनुष्याच्या आयुष्यांतील ) दहा-पंधरा मिनिटें तितकेंच कौशल्य व तितकेंच बाहुबल, हीं त्या नालबंदास जें काम हवें असेल त्या कामासाठीं मीं मिळवून दिलीं पाहिजेत.

कामाच्या न्याय्य मोबदल्याची तात्त्विक उत्पत्ति ही अशी आहे. ती व्यवहारास लागू करतांना आणखी एक गोष्ट लक्षांत घ्यावी लागते. ती म्हणजे जेव्हां आपण एकाद्यास कांहीं काम द्यावयास लावतों, तेव्हां त्या कामाचें जें विशिष्ट स्वरूप असतें, आणि त्याच्या मोबदल्यांत त्याला जो पैसा मिळतो, त्यामुळें कशाहि प्रकारचें काम विकत घेण्याची सामान्य सत्ता त्यास मिळत असते. देशांतील चलनी नाणीं म्हणजे कोणत्याहि प्रकारचें काम विकत घेण्याची सामान्य सत्ता त्यास मिळत असते. देशांतील चलनी नाणें म्हणजे कोणत्याहि प्रकारचें काम मिळवून देणारी अशी त्या राष्ट्राच्या नांवानें काढलेली हुंडीच असते. आपल्या तात्कालिक गरजा ताबडतोब भागविण्यास सामान्यपणें उपयोगी पडण्याचा हा गुण पैशामध्यें असतो. त्यामुळें कोणत्याहि विशिष्ट प्रकारच्या कामापेक्षां पैशाला अधिक महत्त्व मिळत असतें. ही हुंडी वाटेल त्या प्रकारच्या कोणत्याहि कामापेक्षां थोड्या कमी किंमतीची असली, तरीहि ती स्वीकारण्यास लोक नेहमीं तयार असतात. आपणांस वाटेल त्या प्रकारचें अर्ध्या तासाचें किंवा त्याहूनहि कमी काम मिळविण्याची सत्ता मिळत असल्यास, आपलें एक तासाचें काम देण्यास कोणताहि कारागीर सहज तयार होईल. या अनिश्चितीमुळें आणि निरनिराळ्या प्रकारच्या कौशल्याची किंमत पैशांत ठरविणें बरेंच अवघड असल्यामुळें कोणत्याहि विशिष्ट प्रकारच्या कामाचा चलनी नाण्यांत मोबदला ( ढोबळ प्रमाणांत ) ठरविण्याचा प्रश्न घोटाळ्याचा बनत असतो. पण त्यामुळें विनिमयाचें हें तत्त्व बाधित होऊं शकत नाहीं. कामाचें मूल्य ठरविणें हें कठिण असलें, तरीहि त्याला मूल्य आहे हें निश्चित. शिवाय, प्रचलित अडाणी अर्थशास्त्रांतील मागणी-पुरवठ्याच्या नियमानुसार ठरणाऱ्या किमान मूल्याचा निर्णय करणें, हें जितकें कठिण अथवा अनिश्चित असतें, तितकें तरी हें खास कठिण नाहीं. जो न्यायी मनुष्य आहे, तो असें ठरवितो, कीं आपण न्याय्य किंमत दिली पाहिजे. आणि या न्याय्य

किंमतीच्या मर्यादा जरी त्यास आंखतां आल्या नाहींत, तरीहि शक्य तों त्या मर्यादांचें अतिक्रमण आपणांकडून होऊं नये असा प्रयत्न तो करीत असतो.

या प्रश्नाचें जवळजवळ बरोबर असें व्यावहारिक उत्तर त्यास देतां येतें. गरजू मनुष्य किती थोडा मोबदला घेऊन काम करण्यास तयार होईल, याचें शास्त्रीय निदान करणें सोपें आहे. त्याच्या गरजांचा अंदाज अनुमान-धक्क्यानेंच करावा लागतो. परंतु परिस्थितीची मीमांसा करून त्याच्या योग्य मोबदल्याचें निदान करतां येईल.

समजा, माझ्यापाशीं काम मागण्यासाठीं दोन मजूर आले व त्यांपैकीं कमी मजुरी घेणाऱ्याला मीं कामावर लाविलें; तर त्याचा परिणाम असा होईल, कीं जो बेकार राहील तो तर उपाशी राहीलच; पण जो काम करील त्यालाहि अर्धपोटीं रहावें लागेल. उलट, ज्याच्याकडून मी काम घेतों त्याला पुरी मजुरी दिली, तर दुसरा बेकार व उपाशी राहील हें खरें; पण जो काम करील तो तरी पोटभर खाईल व मीं माझ्या पैशांचा योग्य उपयोग केला असें समजलें जाईल. ज्या प्रमाणांत गरजू त्या प्रमाणांत मजुरी, या सध्यांच्या अर्थशास्त्रीय तत्त्वाप्रमाणें जे वागतात ते सर्वांना काम देतात व निदान अर्धें पोट भरण्याला तरी मदत करतात, हा एक भ्रम आहे. प्रचलित आर्थिक योजनेंत सर्वांना काम मिळतें असें नाहीं; बेकारी हें तिचें अविभाज्य अंग आहे. खरें म्हटल्यास जेव्हां मजुरांना कमी मजुरी मिळते तेव्हां बेकारी तर रहातेच पण लोकांना उपाशी मरण्याची पाळी अधिक येते. मी पुरी मजुरी देईन, तर माझ्यापाशीं अकारण धनाचा संचय होणार नाहीं व मी भोग-विलासावर रुपये खर्च करणार नाहीं किंवा करूं शकणार नाहीं. याचा परिणाम असा होईल, कीं बेकारी वाढविण्याला मी निमित्त होणार नाहीं. ज्याला मी योग्य मजुरी देईन, तो इतरांना कामाला लावूं शकेल; इतकेंच नव्हे, तर माझ्याप्रमाणें योग्य मजुरी देण्याला शिकेल व न्यायाचा वृक्ष वठण्याऐवजीं फोफावेल. समाजांत पैशाची सम वांटणी होईल व मूठभर लोकांच्या हातांत अनेक लोकांवर जुलूम करण्याची शक्ति सांठविली न जातां ती पुष्कळांमध्यें विभागली जाईल व म्हणून तिचें अन्यायी सामर्थ्य कमी होईल. समाजांतील निरनिराळ्या श्रेणींतील विषमता कमी झाल्यामुळें एका श्रेणींतून दुसऱ्या श्रेणींत जाणें सध्यां जितकें कठिण

जातें, तितकें तें जाणार नाहीं; म्हणून समाजांतील असूया-वृत्ति कमी होईल. त्यामध्यें अधिक समाधान नांदेल व म्हणून तो सुखी होईल.

स्पर्धेमुळें राष्ट्र संपन्न होतें ही विचारसरणी भ्रामक आहे. याचा परिणाम मजुरी घटण्यामध्यें होईल. कांहीं काल यामुळें पुष्कळ लोक गरीब झाले, तरी कांहीं थोडे लोक श्रीमंत झाल्याचे दिसतात. पण अखेर सर्वांचाच नाश होतो. म्हणून नीति अशी असली पाहिजे, कीं प्रत्येक मजुराला त्याच्या लायकीप्रमाणें मजुरी मिळाली पाहिजे. या नीतीनुसार स्पर्धा राहीलच, पण याचा परिणाम म्हणून लोक अधिक सुखी व चतुर होतील. कारण काम मिळविण्यासाठीं मजुरी कमी मागण्याऐवजीं तें करण्याची लायकी वाढवावी लागेल. सरकारी नोकरीला हाच नियम लागू आहे. तेथें लायकीप्रमाणें कायमचा पगार मिळतो. म्हणून तेथें कमी पगाराची मागणी कोणी करीत नाहीं; तर अधिक लायकीची मागणी करतात. व्यापाराशिवाय अन्य सर्व क्षेत्रांत हाच नियम लागू आहे. उद्योगधंदे व व्यापार यामध्यें मात्र स्पर्धेचा घातुक नियम स्वाभाविक मानला जात आहे. याचा परिणाम असा झाला आहे, कीं या व्यवहारांत सर्वांत अधिक खोटें-नाटें, लांड्या-लबाड्या, दगा-फटका बोकाळला आहे. बाजारांत शुद्ध वस्तू मिळणें दुर्मीळ झालें आहे. कारण मालक मजुराला, मजूर मालकाला दुकानदार गिऱ्हाइकाला व गिऱ्हाईक दुकानदाराला ठकवून त्याच्या पदरांत कमी टाकण्यांतच शहाणपण, हुशारी व स्वार्थ असल्याचें मानतात. अखेर परिणाम सर्वनाशच ! म्हणून सज्जनांनीं म्हटलें आहे, कीं जेथें पैसाच परमेश्वर बनला तेथें खऱ्या परमेश्वराची कोणीच पूजा करीत नाहीं.

संपूर्ण समता आज तरी समाजांत शक्य नाहीं. मानवांत गुणानें कमी-अधिकपणा आहे व तो दीर्घकाल तसा राहील असें मान्यच केलें पाहिजे. जे गुणानें श्रेष्ठ आहेत त्यांना इतरांना मार्ग दाखवून देण्याची किंवा कित्येक प्रसंगीं आपल्या प्रगल्भ ज्ञानानुसार इतरांवर सक्ति करण्याचीहि सत्ता देणें इष्ट आहे. सर्व क्षेत्रांत नियंत्रण आणि सहकार्य हीं जीवनदायी तत्त्वें आहेत आणि अनियंत्रण व स्पर्धा हीं मारक तत्त्वें आहेत.

माझ्या या तत्त्वामुळें मालमत्तेच्या शाश्वतीला कितपत धोका येईल, या शंकेसंबंधीं मी एवढेंच सांगतों, कीं ही शाश्वती कमी करावी असा माझा

हेतु नसून ती शाश्वती अधिक वाढावी हेंच या निबंधाचें रहस्य आहे, असें अखेरीस दिसून येईल. फार पूर्वीपासून हें तत्त्व शाबीत झालें आहे, कीं श्रीमंतांच्या मालमत्तेवर आघात करण्याचा गरिबांना हक्क नाहीं. त्याप्रमाणें गरिबांच्या मालमत्तेवर आघात करण्याचा हक्कहि श्रीमंतांना नाहीं, असें मला शाबीत करावयाचें आहे.

तथापि, ज्या आर्थिक परिस्थितीचें वर्णन मला करावयाचें आहे, ती प्रस्थापित झाल्यास त्याची परंपरागत अप्रत्यक्ष शक्ति कमी झाली नाहीं, तरी संपत्तीरूप सुखदेवतेच्या अंगीं जी शक्ति आज प्रत्यक्ष दिसत आहे, ती कमी होईल. तसेंच कष्टजीवी वर्गाच्या जीवनावर प्रभुत्व गाजविणाऱ्या भांडवलाचें सामर्थ्यहि कमी होईल, हें मी नाकारीत नाहीं. उलट, मोठ्या आनंदानें तें मी कबूल करतों. कारण संपत्तीच्या अंगीं जी आकर्षणशक्ति आज आली आहे व तिला जी सत्ता आज प्राप्त झाली आहे, तिच्यामुळें मनुष्याची विवेकशक्ति भ्रष्ट होत आहे असें मला दिसतें. मागील निबंधांत मीं म्हटलें, कीं प्रचलित अर्थशास्त्रांतील सामान्य तत्त्वें शास्त्रीय म्हणून मान्य करण्यामुळें मानवबुद्धीला जें लांच्छन प्राप्त झालें आहे, त्यास इतिहासांत दाखला सांपडूं शकत नाहीं. असें जें मी म्हणतों त्याला अनेक कारणें आहेत. पण त्यांतील एक कारण थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगतां येईल. आपण अंगीकारिलेल्या धर्मांतील आद्य तत्त्वांना पद्धतशीर धाब्यावर बसविण्याचें यासारखें दुसरें उदाहरण मला कोणत्याहि राष्ट्राच्या इतिहासांत आढळत नाहीं. आपण ( तोंडानें ) ज्या ग्रंथांना परमेश्वरकृत असें म्हणतों त्यांत धनप्रेम हें सर्व आपत्तींचें मूळ आहे, अशा शब्दांनीं या तत्त्वाचा निषेध केला आहे. एवढेंच नव्हे, तर धनाची पूजा करणें हें परमेश्वराला अप्रिय असून परमेश्वराच्या प्राप्तीशीं तें पूर्णपणें विसंगत व अगदीं विरोधी आहे, अशी हे ग्रंथ घोषणा करतात.

तसेंच जेथें जेथें केवळ संपत्तीचा किंवा केवळ दारिद्र्याचा उल्लेख त्यांनीं केला आहे, तेथें तेथें त्यांनीं श्रीमंतांना शाप आणि गरिबांना आशीर्वादच दिलेला आहे. असें असूनहि आम्ही मात्र ‘ श्रीमंत ’ होण्याचें ‘ शास्त्र ’ शोधून काढणें हाच राष्ट्रीय वैभव प्राप्त करण्याचा सर्वांत नजिकचा मार्ग आहे असें समजतों !

●●●

'कामकऱ्यास त्यानें केलेल्या कामाइतकेंच जवळजवळ काम स्वतःसाठीं पुढें केव्हां तरी मिळवितां येईल, इतके पैसे देणें' हाच त्याच्या कामाचा न्याय्य मोबदला होय, असें आपण मागील निबंधांत ठरविलें. आतां ही समानता प्राप्त करण्याच्या साधनांचा विचार आपणांस करावयाचा आहे. या प्रश्नांत 'मूल्य', 'संपत्ति', 'बाजारभाव' आणि 'उत्पादन' या सर्वांच्या व्याख्या अंतर्भूत होतात. ज्या श्रमामुळें उपयुक्त वस्तु निर्माण होते तेच खरे श्रम, असें म्हटलें पाहिजे. मात्र जी माणसाची एकादी वासना अगर हेतु तृप्त करते ती उपयुक्त वस्तु होय, असें म्हणणें व मानणें बरोबर होणार नाहीं. जिच्यामुळें माणसाचें भरणपोषण होतें व त्याचें नैतिक बल वाढतें तीच खरी उपयुक्त व इष्ट वस्तु म्हटली पाहिजे. अर्थशास्त्राप्रमाणें ज्या उपयुक्त व इष्ट वस्तूंना विनिमय-मूल्य आहे, त्या सर्वांचा संपत्तींत अंतर्भाव होतो. परंतु कोणत्याहि वस्तूची उपयुक्तता तिचा उपयोग करूं इच्छिणारे आणि करूं शकणारे किती लोक आहेत त्यावरच मुख्यतः अवलंबून असते. त्याचप्रमाणें एकाद्या वस्तूची इष्टता तिच्याविषयीं किती लोकांत आवड आहे किंवा ती उत्पन्न करतां येईल यावर अवलंबून आहे. याचाच अर्थ असा, कीं कोणत्याहि वस्तूची इष्टता ही तत्सापेक्ष मानवी वृत्तीवर अवलंबून असते. म्हणून अर्थशास्त्र हें संपत्तीचें शास्त्र असल्यामुळें त्यांत मानवी वृत्ती आणि वासना अथवा उपभोगक्षमता यांचा विचार करावा लागतो. पण नैतिक विचारांचा अर्थशास्त्राशीं कांहींच संबंध नाहीं असें मिल्ल म्हणतो; आणि म्हणून मनुष्याची उपभोगक्षमता व त्याच्या वृत्ती यांच्याशींहि नैतिक विचारांचा कांहीं संबंध येत नाहीं असें सिद्ध होतें. पण वस्तूचें मूल्य तिच्यासंबंधींच्या लोकमतावर आणि तिच्या मोजमापावर अवलंबून नसतें, निदान असतां कामा नये. माणसाची आवडनिवड कांहींहि असो; एकाद्या वस्तूमध्यें जीवनाला पुष्टि देण्याचा गुण जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत ती मूल्यवानच समजली जाईल.

राष्ट्रांनीं जीवनपोषक पदार्थांची वासना धरावी व त्यांच्या निर्मितीसाठीं कष्ट करावेत, तसेंच जीवनाला हानिकारक अशा वस्तूंचा तिरस्कार करावा

व त्यांचा नाश करावा, असें शिकविणारें शास्त्रच खरें अर्थशास्त्र होय. ज्या वस्तू जीवनाला पोषक असतात, त्या निर्माण करण्यावरच माणसाची श्रमशक्ति खर्च झाली पाहिजे. ज्या वस्तू जीवनाला पोषक आहेत त्या निर्माण करण्या-ऐवजीं ज्या मारक आहेत किंवा निव्वळ शोभा देणाऱ्या अतएव निरुपयोगी वस्तू आहेत त्यांच्या निर्मितीवर श्रमशक्ति खर्च करणें हें सुधारलेल्या समाजाचें खास लक्षण नव्हे. तसेंच हवा-पाणी, अन्न-वस्त्र, स्वच्छ राहणी, शिक्षण या-साठीं लागणाऱ्या वस्तूंचें उत्पादन, वितरण व संचय कसे करावेत या गोष्टी लोकांना शिकविल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें वस्तुतः शांतता, परस्पर-विश्वास व प्रेम यांच्या आधारेंच मनुष्यास या इतर वस्तूंचा उपभोग घेणें शक्य होतें, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

ज्या जीवनोपयोगी आहेत व ज्यांचा आपण उपयोग करूं शकतों, अशा वस्तूंचा संचय म्हणजे संपत्ति होय. समाजांतील एक शक्ति या दृष्टीनें आपण जेव्हां संपत्तीचा विचार करतों तेव्हां या दोन्हीहि गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत. म्हणून कोणत्या प्रकारें लोक संपत्ति निर्माण करण्याच्या कामाला लागले आहेत व त्यांत कोण यश मिळवीत आहेत ही गोष्ट महत्त्वाची आहे. कारण संपत्ति साधनमात्र आहे व तिच्यामुळें सुखाप्रमाणें दुःखाचाहि लाभ होऊं शकतो. ती सज्जन माणसाच्या हातांत असली तर जीवनोपयोगी वस्तूंच्या निर्मितीकडे तिचा विनियोग होऊन राष्ट्र खऱ्या अर्थानें सुखी व संपन्न होईल. उलट, दुर्जनाच्या हातांतील संपत्ति जीवनाला मारक अशा वस्तू निर्माण करण्याकडे खर्च होऊन त्यामुळें राष्ट्राचा नाश होईल व तें दुःखाच्या खोल गर्तेंत किंवा खाईत जाऊन पडेल.

विनिमयानें धनाची वृद्धि होते हाहि एक भ्रम आहे. भौतिक संपत्तीची वृद्धि केवळ उत्पादनानें अथवा संशोधनानेंच होते; ती विनिमयानें होऊं शकत नाहीं. विनिमयानें जेथें जेथें भौतिक नफा झाल्याचें दिसतें, तेथें तेथें या प्रत्येक 'धन' संख्येबरोबरच तेवढीच 'ऋण' संख्या निर्माण होत असते, पण दुर्दैवानें या 'धन'संख्या जगाच्या डोळ्यांत एकदम भरतात आणि प्रतिष्ठा पावतात. त्याच्या उलट, 'ऋण'संख्या मागें पडतात, बाजूच्या गल्लींत किंवा अंधेऱ्या जागेंत त्या दृष्टीआड होतात. विनिमयांतून धनाचा लाभ होणें हें विनिमय करणाऱ्या दोन पक्षांपैकीं एका पक्षाच्या अज्ञानावर व

दौर्बल्यावर अवलंबून असतें. म्हणून सध्यांचें विनिमयशास्त्र खरें किंवा न्याय्य अर्थशास्त्र नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. न्याय्य अर्थशास्त्रीय विनिमय करण्यापासून दोन्ही पक्षास लाभ झाला पाहिजे; निदान कोणाची हानि तरी होतां कामा नये. तसेंच, जे मध्यस्थ म्हणजे व्यापारी असतील त्यांना आपल्या बुद्धीचें, श्रमाचें आणि कालाचें न्याय्य वेतन मिळालें पाहिजे. कोणत्याहि पक्षास जो लाभ झाला असेल अथवा मध्यस्थास जें वेतन मिळालें असेल, तें त्या व्यवहाराशीं संबंध असलेल्या सर्वांना पूर्णपणें माहीत असलें पाहिजे. व्यवहारांत कोठेंहि गुप्तता ठेवण्याचे प्रयत्न होत असतील, तर अविद्येवर आधारलेल्या असुरी शास्त्राचा व्यवहार कोठें तरी चालू आहे असें समजावयास हरकत नाहीं. म्हणूनच तो ज्यू व्यापारी दुसऱ्या एका ठिकाणीं म्हणतो, "ज्याप्रमाणें दोन दगड सांधणारा खिळा दोहोंतहि घुसत असतो, त्याचप्रमाणें क्रय आणि विक्रय या दोन्ही क्रियांत पाप घुसलेलें असतें." लोखंडी खिळ्यांनीं सांधलेला दगड-लांकडांचा कोट ज्याप्रमाणें विद्युत्पातानें उध्वस्त होतो, त्याचप्रमाणें लोभमूलक पापी क्रय-विक्रयावर उभारलेली सामाजिक रचना परमेश्वरी प्रकोपानें उध्वस्त होईल. पण लाभाचे दोन प्रकार असतात. आपल्या गरजा भागणें हा एक प्रकार असून आपल्या वासना तृप्त होणें हा त्याचाच दुसरा प्रकार आहे. आजच्या जगांत ज्या वस्तूंना मागणी असते, त्यांपैकीं तीनचतुर्थांश वस्तू काल्पनिक गरजा अथवा वासना भागविणाऱ्याच असतात. लोकांच्या आवडी, आकांक्षा, ध्येयें अथवा भ्रम यांच्यावरच त्या वस्तूंची मागणी आधारलेली असते. म्हणून आपल्या आय-व्ययाचें नियमन करणें, म्हणजे आपल्या वासनांचें व आकांक्षांचें नियंत्रण करणें असाच अर्थ तत्त्वतः करावा लागतो. म्हणून बाजारभाव ठरविण्याच्या प्रश्नाला फार मोठें महत्त्व आहे. बाजारभावाचा निर्णय करतांना पुढील गोष्टींचा विचार करावा लागतो. कोणत्याहि वस्तूचा भाव, म्हणजे ती मिळविण्यासाठीं एकाद्या मनुष्यास जे श्रम वेंचावे लागतात, ते श्रमच होत. हा भाव पुढील चार गोष्टींवर अवलंबून असतो; व त्या नित्य कमी-अधिक होत असतात. (१) ती वस्तु प्राप्त होण्यासंबंधीं ग्राहकास असणाऱ्या वासनेची तीव्रता. (२) हिच्याशीं विरोधी अशी तीच वस्तु आपल्यापाशीं ठेवण्याची विक्रेत्यास असलेली तीव्रता. (३) ती वस्तु स्वतः संपादन करण्यासाठीं ग्राहकास करतां

येणाऱ्या श्रमाचें प्रमाण, आणि ( ४ ) ती वस्तु आपणापाशीं ठेवण्यासाठीं विक्रेता जेवढे कष्ट भोगण्यास तयार असेल त्यांचें प्रमाण. या गोष्टी जेव्हां अधिक प्रमाणांत असतील तेव्हांच त्या कार्यक्षम बनतात. म्हणजे वासनेची तीव्रता याचा अर्थ इतर वस्तूंच्या वासनेपेक्षां या विशिष्ट वस्तूसंबंधीं असणाऱ्या वासनेचें आधिक्य. तसेंच त्या वस्तूसाठीं देण्याचे श्रम, म्हणजे इतर वस्तूंसाठीं कराव्या लागणाऱ्या श्रमाहून या वस्तूसाठीं कराव्या लागणाऱ्या श्रमाचें आधिक्य.

श्रम म्हणजे जीवनशक्तीचा मृत्यूशीं चालू असलेला लढाच होय. जीवन या शब्दांत मानवाच्या शारीरिक, बौद्धिक व आत्मिक शक्तींचा अंतर्भाव होतो; आणि एकादा प्रश्न सोडविणें, अडचण उल्लंघणें, प्रयोग करणें अथवा भौतिक शक्तीचा प्रतिकार करणें इत्यादि अनेक रूपांनीं ही जीवनशक्ति विरोधी शक्तींशीं झुंजत असते.

कोणत्याहि श्रमांत जीवनांतील विविध शक्तींचा ज्या प्रमाणांत व्यय होत असेल, त्या मानानें ते श्रम श्रेष्ठ अथवा कनिष्ठ दर्जाचे ठरत असतात, आणि कोणत्याहि प्रकारच्या श्रेष्ठ दर्जाच्या कामांत शारीरिक शक्ति संपूर्ण व योग्य प्रकारें उपयोगांत येण्यास योग्य प्रमाणांत बुद्धीची व भावनेची शक्तीहि तींत अंतर्भूत व्हावी लागते.

आपण श्रमांच्या मूल्यासंबंधीं किंवा भावासंबंधीं विवेचन करीत असतों, तेव्हां त्या श्रमांचा विशिष्ट प्रकार आणि विशिष्ट दर्जा लक्षांत घेऊनच बोललें पाहिजे.

श्रम हे परिणामतः विविध प्रकारचे असतात व ते अनेक हेतूंनीं प्रेरित होऊन केलेले असतात. म्हणून कोणतेंहि राष्ट्र जीवनास पोषक अशा वस्तू निर्माण करण्याच्या व उपभोगाच्या कामीं आपली श्रमशक्ति किती प्रमाणांत वेंचितें, त्यांवर त्याचें वैभव अवलंबून असतें. म्हणजे धनाचें उत्पादनच शहाणपणानें केलें पाहिजे असें नाहीं, तर त्याचें विभाजन आणि उपभोग हेहि शहाणपणानेंच झाले पाहिजेत. पुष्कळसे अर्थशास्त्रज्ञ नेहमीं अशा प्रकारें लिहीत असतात, कीं वस्तूंच्या केवळ उपभोगाला कांहीं महत्त्व नाहीं. हें तर खरें नाहींच, पण याच्या उलट असें म्हटलें पाहिजे, कीं केवळ उपभोग हाच संपत्तीच्या निर्मितीचा अंतिम उद्देश, साध्य आणि परिणति होय.

तसेंच उत्पादन-कलेंतील नैपुण्यापेक्षां उपभोगाच्या कलेंतील नैपुण्य हें फार कठिण आहे. पैसे मिळवूं शकणाऱ्या वीस लोकांत एकादाच असा असतो, कीं ज्याला त्याचा योग्य प्रकारें उपभोग घेतां येतो, आणि राष्ट्राच्या दृष्टीनें असो कीं व्यक्तीच्या दृष्टीनें असो, जिव्हाळ्याचा प्रश्न ते "किती पैसा मिळवितात ?" हा नसून ते "तो पैसा कोणत्या कामीं लावतात ?" हाच असतो.

भांडवल या शब्दावरून 'सांठा, उगम किंवा मूलद्रव्य' असा बोध होत असतो. ज्या मूलद्रव्यापासून दुसरें द्रव्य निर्माण होतें, तें मूलद्रव्य म्हणजे भांडवल होय. जेव्हां तें आपणाहून भिन्न असें दुसरें द्रव्य निर्माण करील, तेव्हांच त्यास भांडवल असें नांव देतां येईल. मूळ जसें दुसरें मूळ निर्मिल्यावांचून सार्थ होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें भांडवल हें दुसरें कांहीं तरी निर्माण केल्याशिवाय सार्थ होऊं शकत नाहीं. मुळांतून निर्माण झालेल्या मुळापासून पुन्हां मूळ निर्माण होतें, तसें भांडवलांतूनहि पुन्हां भांडवल निर्माण होतें; पण जें भांडवल भांडवलाव्यतिरिक्त दुसरें कांहींच निर्माण करूं शकत नाहीं, तें केवळ दुसरें मूळ निर्माण करणाऱ्या मुळासारखें अथवा केवळ दुसरी कळी निर्माण करणाऱ्या कळीसारखें निरर्थक होय. म्हणून एक भांडवल पुन्हां दुसरें भांडवल किती लवकर निर्माण करील, हा प्रश्न महत्त्वाचा नसून जीवनाला पोषक असें कोणतें द्रव्य त्यापासून निर्माण होणार आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. जीवनाचें रक्षण करणारें कोणतें विधायक कार्य तें करणार आहे ? जर तें तसें कांहींच करणार नसेल, तर त्याची पुनर्निर्मिति ही निरर्थकच ठरेल; आणि जर तें जीवनाला विघातक वस्तू निर्माण करणार असेल, तर ती पुनर्निर्मिति त्याहूनहि हीन ठरेल. अशा भांडवलावर मिळणारा नफा हा नफा नसून आपली मालमत्ता गहाण टाकून सूडदेवतेकडून काढलेलें तें कर्जच ठरेल ! पाण्याचीं उगमस्थानें ढग आहेत, तसेंच भांडवल हें संपत्तीचें उगमस्थान आहे. पण या जगांत जेव्हां पाणी नसतें आणि एका ढगांतून केवळ दुसऱ्या ढगाचाच जेव्हां उद्भव होऊं लागतो, तेव्हां पावसाच्याऐवजीं ते क्रोधगर्जना करूं लागतात आणि पिकांच्याऐवजीं विजेचा लोळ जमिनीवर येऊन पडतो. भांडवलाचें खरें स्वरूप हें असें असल्यानें, कोणत्याहि उद्योगी राष्ट्रांत नेहमीं दोन प्रकारचें उत्पादन सुरू

असतें. एकांतून ' बीं ' निपजतें व दुसऱ्यांतून अन्न निर्माण होतें; किंवा पहिलें भूमींत पडतें व दुसरें तोंडांत पडतें. लोभी लोकांना तें कोठारांत भरून ठेवणें हाच त्यांचा उपयोग वाटतो. पण कोठारांचा उपयोग हा केवळ दरम्यानचा असतो. मध्यंतरींच्या काळांत रक्षण करणें हेंच त्याचें कार्य. धान्याचें विभाजन होईल, तेव्हांच त्याचा उद्देश सफल होतो. तसें न होईल तर तें फक्त कुजून जाईल अथवा त्यामुळें किडे व उंदीर यांचेंच पोषण होईल. तसेंच भूमींत पेरावयाचें बीं हेंसुद्धां अखेरीस तोंडांत जाणारें अन्न निर्माण करण्यासाठींच असल्यानें सर्व उत्पादन हें वस्तुतः उपभोगासाठींच असलें पाहिजे. उपभोग हेंच उत्पादनाचें उद्दिष्ट होय व त्यापासून किती लोकांना अन्न मिळतें यावरूनच त्यांचें मोजमाप करावें लागतें. राष्ट्राची संपत्ति मोजावयाची तर तें राष्ट्र किती वस्तूंचा उपभोग घेते, यावरूनच ती मोजली पाहिजे.

तेव्हां जीवनाव्यतिरिक्त दुसरी कोणतीहि संपत्ति नाहीं. येथें जीवन या शब्दांत प्रेम, आनंद, कौतुक इत्यादि जीवनाच्या सर्व शक्तींचा समावेश केलेला आहे. ज्या देशांत उदात्त व आनंदी मानवप्राण्यांची मोठ्यांत मोठी संख्या नांदत असते, तोच देश सर्वांत अधिक समृद्ध होय. तसेंच आपल्या जीवनाच्या सर्व शक्तींचा ज्यानें पूर्ण विकास केला आहे व आपल्या शीलानें व संपत्तीनें जो इतरांच्या जीवनाचा विकास करण्यास साहाय्यभूत होत आहे, तोच खरा श्रीमंत मनुष्य होय.

हा भोग-विलासांचा काळ नाहीं. प्रत्येकानें स्वत: होईल तितकी मेहनत केली पाहिजे. जेथें एक मनुष्य आळशी राहतो, तेथें दुसऱ्याला दुप्पट मेहनत करावी लागते. इंग्लंडांत आज बेकारी माजली आहे याचें कारण हेंच आहे. पुष्कळांच्यापाशीं धन असूनहि ते उपयुक्त काम करीत नाहींत. याचा परिणाम असा होतो, कीं इतरांना त्यांच्यासाठीं काम करावें लागतें. या श्रमाचा उपयोग नसल्यामुळें त्यापासून, तें करणाऱ्याचा लाभ होत नाहीं, व राष्ट्राची संपत्ति घटते. शिवाय, या सर्वांतून असूया उत्पन्न होते व असंतोष वाढतो. व अखेर त्यांतून श्रीमंत-गरीब, मालक-मजूर यांच्यामध्यें संघर्ष उत्पन्न होतात व अन्तीं याचा परिणाम सर्वत्र मानवता गमावून बसण्यांत होतो.

●●●

# बायबलमधील कथा

रस्किननें आपल्या या पुस्तकाला 'अन् टु धिस् लास्ट' ('ह्या शेवटच्यालाहि') असें जें शीर्षक दिलें आहे, तें बायबलमधील एका कथेवरून दिलें आहे. ती कथा अशी :

एका गृहस्थानें दिवसाला एक पेनी ही मजुरी ठरवून कांहीं मजुरांना आपल्या द्राक्षाच्या मळ्यांत कामाला पाठविलें. दुपारीं तो पुन्हां मजुरांच्या अड्ड्यावर गेला तेव्हां त्याला कांहीं मजूर तेथें उभे असलेले आढळले. तेव्हां तो त्यांना म्हणाला तुम्हीहि माझ्या मळ्यावर कामाला जा. जी योग्य असेल ती मजुरी मी तुम्हांला देईन. तिसऱ्या प्रहरीं पुन: तो तेथें गेला, तेव्हां परत कांहीं मजूर तेथें काम न मिळाल्यामुळें त्याला बसलेले दिसले. त्यांनाहि त्यानें आपल्या मळ्यावर कामावर पाठविलें. सायंकाळच्या सुमारास पुन्हां तो मजुरांच्या अड्ड्यावर गेला तेव्हां अजूनहि कांहीं मजूर तेथें तिष्ठत बसलेले त्यानें पाहिले. तो त्यांना म्हणाला, " तुम्ही येथें असे संबंध दिवस माशा मारीत कां बसलां आहांत ? " " आम्हांला कोणी कामावर पाठविलें नाहीं म्हणून, " मजुरांनीं उत्तर दिलें. तो उत्तरला, " तुम्हीहि माझ्या मळ्यावर कामाला जा. जें योग्य असेल तें तुम्हांला मिळेल."

रात्र पडल्यानंतर त्या मळ्याचा मालक आपल्या मुनिमाला म्हणाला, " सर्व मजुरांना बोलवा व त्यांची मजुरी त्यांना द्या. शेवटच्यापासून प्रथम सुरुवात करा तों पहिल्यापर्यंत." जे अगदीं शेवटीं कामावर आले होते त्यांनाहि एक पेनीच मिळाली. जे कामावर आधीं आले होते त्यांना वाटलें कीं आपणांला अधिक मजुरी मिळेल. पण त्यांच्यापैकीं प्रत्येकालाहि एकच पेनी मिळाली. तेव्हां ते आपआपसांत कुजबुजूं लागले व अखेर मालकाला म्हणाले, " जे अगदीं शेवटीं आले त्यांनीं फक्त एक तासच काम केलें. पण ज्या आम्हीं दिवसभर उन्हांत काम करून घाम गाळला, त्यांनाहि तुम्हीं त्यांच्याइतकीच मजुरी दिली." त्यानें उत्तर दिलें, " मीं तुमच्यावर कांहींच

अन्याय केलेला नाहीं. एक पेनी घेऊन दिवसभर काम करण्याला तुम्ही आपली कबुली दिली होती ना ? जें न्यायानें तुमचें आहे तें घ्या व आपल्या घरीं जा. तुम्हांला जितकें दिलें आहे तितकेंच या शेवटच्यालाहि मी देईन. जें माझें आहे, त्याचें वाटेल तें करायला मी मालक नाहीं का ? मी चांगला वागलों म्हणून तुम्हांला वाईट कां वाटावें ? जो शेवटीं आहे तो पहिला येईल व जो पहिला आहे तो शेवटीं जाईल. कारण पुष्कळांना बोलाविलें, तरी थोड्यांचीच निवड होईल." [ St. Mathews, ch. 20 ]

●●●

REFBK-0007464
REFBK-0007464

## सर्वोदय-तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांसाठीं

# आमचीं आदर्श प्रकाशनें

### महात्मा गांधी

| | | |
|---|---|---|
| १ | सत्याचे प्रयोग | ९ |
| २ | संयम कीं स्वैराचार ? | १\|\|\| |
| ३ | संपूर्ण स्वदेशी | २\| |
| ४ | दिल्ली-डायरी | ६ |
| ५ | गांधीजींचें मानस | ४ |

### डॉ. राधाकृष्णन्

| | | |
|---|---|---|
| १ | हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें | २\|\| |
| २ | गांधीजींचें विविध दर्शन | २\|\| |
| ३ | संस्कृतीचें भवितव्य | १\| |
| ४ | महात्मा गौतम बुद्ध | १\| |

### पं. जवाहरलाल नेहरू

| | | |
|---|---|---|
| १ | आत्मचरित्र | १२\|\| |

### साने गुरुजी

| | | |
|---|---|---|
| १ | भारतीय संस्कृति | ३ |
| २ | विश्राम | १\|\| |
| ३ | गीता-हृदय | ·\|\|\|· |
| ४ | मानवजातीची कथा | ८ |
| ५ | विनोबाजी भावे | १ |
| ६ | पत्री | ३\|\| |

### काकासाहेब कालेलकर

| | | |
|---|---|---|
| १ | जिवंत व्रतोत्सव | ३\|\|\| |
| २ | हिंदूंचें समाजकारण | २\| |

### ना. ग. जोशी

| | | |
|---|---|---|
| १ | विश्वमानव | २\| |
| २ | जीवनयोग | ·\|\|\|· |

### आचार्य जावडेकर

| | | |
|---|---|---|
| १ | अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र ? | २ |
| २ | वाल्मीकि-आश्रमांतील प्रवचनें | १ |
| ३ | हिंदु-मुसलमान-ऐक्य | ३ |
| ४ | लो. टिळक व म. गांधी | २ |
| ५ | समाईक सहकारी स्वराज्य | ·\|· |

### शंकरराव देव

| | | |
|---|---|---|
| १ | उपनिषदांतील दहा गोष्टी | ·\|\|\|· |
| २ | उपनिषत्सार | ३ |

### आचार्य भागवत

| | | |
|---|---|---|
| १ | जीवन आणि साहित्य | २\|\| |

### खलिल जिब्रान

| | | |
|---|---|---|
| १ | जीवन-दर्शन | १\|\|\| |

### नरहरिभाई परीख

| | | |
|---|---|---|
| १ | यंत्राची मर्यादा | २\|\| |

### गो. आ. देशपांडे

| | | |
|---|---|---|
| १ | कॉंग्रेस-कथा | ४\|\| |

### आचार्य कृपलानी

| | | |
|---|---|---|
| १ | निवडक लेख व भाषणें | ३ |

### प्रेमा कंटक

| | | |
|---|---|---|
| १ | सत्याग्रही महाराष्ट्र | ३ |
| २ | भ्रान्त जीवन | २\| |

### जयप्रकाश नारायण

| | | |
|---|---|---|
| १ | समाजवादच कां ? | २ |

## सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणें २